# जाहिरात

# उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर

## वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पद्धतीने पदे भरण्याबाबत थेट मुलाखत

मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवडसमितीद्वारे आरोग्य सेवा, नागपूर मंडळाअंतर्गत असलेल्या भंडारा/चंद्रपूर/गोंदिया/वर्धा/नागपूर/गडचिरोली या जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालयातील महाराष्ट्र आरोग्य सेवा (गट-अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पद्धतीने रिक्त ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

सदरहू **तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पदे भरण्याकरिता माहे डिसेंबर २०१८ पासून दर सोमवारी वॉक इन इंटरव्ह्यू दुपारी १.०० ते ४.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) उपसंचालक आरोग्य सेवा, श्रद्धानंदपेठ, दिक्षाभुमीजवळ, नागपूर-२२ येथे आयोजित करण्यात येत आहे.** तरी इच्छुक एमबीबीएस/विशेषज्ञ अर्हताधारक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता नमूद दिनांक व वेळेत उपस्थित रहावे.

उमेदवारांनी येताना सोबत एम.बी.बी.एस. व विशेषज्ञ पदासाठी पदव्यूत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका, पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादीसोबत घेवून येणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे वय ५८ वर्षांपेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरिता काढून टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

अ) एमबीबीएस पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात ४५,०००/- व इतर भागात रु. ४०,०००/- एवढे मानधन राहील. **(एकूण रिक्त पदे- १८४)**

ब) विशेषज्ञ पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात ५५,०००/- व इतर भागात रु. ५०,०००/- एवढे मानधन राहील. **(एकूण रिक्त पदे-८०)**

स्वाक्षरी<br>अध्यक्ष, विभागीय निवड समिती<br>तथा, विभागीय आयुक्त नागपूर

स्वाक्षरी<br>सदस्य सचिव, तथा उपसंचालक<br>आरोग्य सेवा नागपूर

(संचालक माहिती/नाग/१३६१/२०१८)